जनसंपर्क अधिकारी, पोलीस आयुक्तालय,
ठाणे शहर

इमेल-cp.thane.pro@mahapolice.gov.in

मो.क्र.9819208279

**प्रेसनोट** **दिनांक ०९.११.२०२४**

## ‘‘ बेकायदेशीररित्या गावठी बनावटीचे ०३ अग्निशस्त्र, दोन मॅक्झिन,०३ जिवंत काडतुस विक्री करण्याकरीता आलेल्या इसमास नारपोली पोलीस ठाणे यांच्याकडुन अटक’’

---

दिनांक ०८.११.२०२४ रोजी नारपोली पोलीस ठाण्याचे सपोनि/विजय मोरे व अंमलदार हे ग्रस्त करीत असताना त्यांना गुप्त बातमीदारामार्फत माहिती मिळाली की, एक इसम त्याच्या ताब्यातील अग्निशस्त्र विक्री करण्याकरीता धामणकर नाका ते अंजुर फाटा यांना जोडणाऱ्या बांधकाम चालू असलेल्या मेट्रो स्टेशनचे खाली सार्वजनिक रोडवर, विजय भजीया सेंटर समोर या ठिकाणी ०९.३० वाजता येणार आहे अशा आशयाची बातमी मिळाली. सदरबाबत वपोनि/श्री.कामत यांनी दिलेल्या सुचनेप्रमाणे सपोनि/मोरे व पथक यांनी मिळालेल्या बातमीच्या अनुषंगाने धामणकर नाका ते अंजुर फाटा यांना जोडणाऱ्या बांधकाम चालू असलेल्या मेट्रो स्टेशनचे खाली सार्वजनिक रोडवर विजय भजीया सेंटर समोर या ठिकाणी सापळा कारवाई दरम्यान इसम नामे सहवाग घनश्याम चतरावत, वय २२ वर्ष, रा.राजस्थान राज्य यास ताब्यात घेण्यात आले. त्याचे अंगझडतीत गावठी बनावटीचे ३ अग्निशस्त्र, दोन मॅक्झिन, ३ जिवंत काडतुस, ओप्पो कंपनीचा मोबाईल असा एकूण १,७३,०००/- रु. किमंतीचा मुद्देमाल हस्तगत करण्यात आलेला आहे.

सदर घटनेबाबत आरोपीविरूध्द नारपोली पोलीस ठाणे गु.रजि.क्र. । १७५७/२०२४ भारतीय शस्त्र अधिनियम ३,२५( ब-१) अ, सह मुंबई पोलीस कायदा कलम ३७(१) (३),१३५ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

सदरची कारवाई पोलीस उप आयुक्त,परिमंडळ-२, भिवंडी, डॉ.मोहन दहिकर, सहाय्यक पोलीस आयुक्त, पुर्व विभाग भिवंडी, श्री.सांगळे, वरिष्ठ पोलीस निरीक्षक श्री.कामत यांच्या सुचना व मार्गदर्शनाखाली सपोनि/विजय मोरे, पोहवा/३४७३ सस्कर, व त्यांच्या पथकाने केली आहे.

( शैलेश साळवी )
वरिष्ठ पोलीस निरीक्षक तथा जनसंपर्क
अधिकारी, पोलीस आयुक्तालय,
ठाणे शहर